दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २४४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.१५ एप्रिल २०२५


**सुविचार**

निघून गेलेला क्षण कधीच परत येत नाही, जे होऊन गेले त्याचा विचार करू नका, पुढे काय करू शकता याचा विचार करा...






# महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा ट्रीस्ट! भाजप- काँग्रेसची युती ?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, सोलापूर :** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत सर्वात मोठा ट्रीस्ट निर्माण झाला आहे. बाजार समितीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसच्या पॅनलने युती केली आहे. त्यामुळे या निवडणुकीची अन् युतीची सध्या राज्याच्या राजकारणात जोरदार चर्चा होत आहे. नेमकं काय घडलं? वाचा सविस्तर..

यााबाबत सविस्तर माहिती अशी की, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट निर्माण झाला असून बाजार समितीच्या निवडणुकीसाठी भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजप-काँग्रेस नेत्यांचे एकत्रित पॅनल केले आहे. यामध्ये काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने, काँग्रेस कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, काँग्रेस नेते बाळासाहेब शेळके यांचा सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखालील पॅनलला पाठिंबा दिला आहे.




भाजपचे आमदार सुभाष देशमुख आणि आमदार विजयकुमार देशमुख यांना देखील सोबत येण्याचे आवाहनही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केली आहे. मात्र माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख हे पुन्हा एकदा स्वतंत्र लढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तत्पुर्वी, मागच्या निवडणुकीच्या वेळेस ही तत्कालीन पालकमंत्री भाजप आमदार विजयकुमार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पॅनलला काँग्रेस नेते दिलीप माने यांनी पाठिंबा दिला होता. तर आमदार सुभाष देशमुख हे विरोधी पॅनलमध्ये निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते.

दरम्यान, या युतीवरुन भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. ‘आम्ही मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवतोय, यामध्ये कोणत्याही पक्षीय राजकारणचा विषय नाही. दोन्ही देशमुख हे आमचे नेते आहेत त्यांना देखील सोबत येण्याचे आवाहन आम्ही केले आहे. ‘पण इतक्या लोकांनी अर्ज दाखल केले आहे त्यामुळे निवडणूक बिनविरोध होणे कठीण आहे पण आम्ही त्या दृष्टीने प्रयत्न करतोय, असे ते म्हणाल्यात.

तसेच मुख्यमंत्र्यांनी सचिन दादांना सूचना केल्या होत्या त्यांनी आम्हाला आवाहन केलं त्या आम्हाला मान्य आहे. त्यामुळे आम्ही एकत्रित येऊन लढण्याचा निर्णय केलाय, बाजार समितीचे हित हेच आमचे लक्ष्य आहे. सहकारच्या बाबतीत मी स्वतंत्र निर्णय घेत असतो, मी स्वयंभु आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांनी दिली आहे.

## थोडक्यात

### १ चूक अन् १४ लाखांचे दागिने गायब

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१४, मुंबई :** लग्न म्हटल्यावर लग्न घरात गडबड ही आलीच. पाहुण्यांची रेलचेल. कामाचा उरक. प्रत्येकाला भेटणे विचारपूस करणे या गोष्टी त्या बरोबर आल्याच. तर काहींवर दागिने सांभाळण्याची खास जबाबदारी दिली जाते. तर काहींवर स्वत:चेच दागिने सांभाळण्याची जबाबदारी असते. पण त्यात ही काही वेळ एक चुक महागात पडते. अशीच एक घटना नवी मुंबईत घडली आहे. लग्न घरात एका चुकीमुळे काही क्षणात तब्बल १४ लाखाचे दागिने गायब करण्यात आले. पण यात खरा ट्वीस्ट नंतर आला.

वाशी गावात हळदी समारंभासाठी आलेल्या पाहुण्याचे १४ लाखांचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली. परेश पवार हे ठाण्याचे राहाणारे आहे. त्यांच्या भाचीचे लग्न होते. त्यासाठी ते ठाण्यावरून वाशी गावात आले होते. भाचीची त्या दिवशी हळद होती. हळद म्हटल्यावर मोठी गर्दी असणार हे त्यांना माहित होते. पण लग्न असल्याने ते ही बरेच दागिने घालून आले होते. पण रिस्क नको म्हणून त्यांना अंगावर घातलेले दागिने आपल्या गाडीत ठेवले. त्यानंतर ते लग्न मंडपात आले. त्याच वेळी त्यांना आपल्या गाडीची चावी अनावधानाने मंडपातील टेबलवर ठेवली. ही चावी त्याच लग्नात आलेल्या अंकुश सरगरच्या हाती लागली. हा एक ओला ड्राव्हर आहे. हीच संधी साधत त्याने डाव साधला. त्याने परेश यांची गाडी खोलली. गाडीत असलेले १४ लाखाचे दागिने त्याने लंपास केले. दागिने हाती लागल्यानंतर त्याने तिथून धूम ठोकली. त्यावेळी परेश हे भाचीच्या हळदीमध्ये दंग होते. ज्या वेळी ते गाडीत परतले त्यावेळी त्यांना दागिने जागेवर दिसले नाहीत.

दागिने गाडीतून गायब झाल्याने त्यांना धक्का बसला. त्यांनी तातडीने वाशी पोलिस स्टेशन गाठले. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. तिथे त्यांना सीसीटीव्ही कॅमेरे दिसले. त्याचे फुटेज त्यांना चेक केले. त्यात त्यांना अंकुश चोरी करताना दिसला. त्यानंतर साडे तीन तासात आरोपीचा शोध घेतला. त्यानंतर त्याच्याकडून सर्व दागिने हस्तगत करण्यात आले. हे दागिने पवार कुटुंबाला परत करण्यात आले. दागिने मिळाल्याने परेश यांनी सुटकेचा निश्वास टाकला.

# वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरचा प्लॅन ? ५० कोटीची ऑफर !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, बीड :** संतोष देशमुख हत्या प्रकरणातला प्रमुख आरोप वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर देण्यात आली आहोत. त्यासाठी १० ते ५० कोटी रुपये दिले जाणार होते. असा दावा बीडचे निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी केला आहे. त्यांनी याबाबत एक व्हिडीओ बनवला आहे. त्यात त्यांनी काही खळबळजनक गोष्टी सांगितल्या आहेत. फेक एन्काऊंटर बाबतही त्यांनी वक्तव्य केलं आहे. त्यात त्यांनी मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री, गृह सचिव यांचे ही नाव घेतले आहे. कासले यांच्या दाव्याने आता नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची मला ऑफर होती, असा दावा कासले यांनी केलाय. बोगस एन्काऊंटरसाठी पाच कोटी, दहा कोटी आणि ५० कोटींची ऑफर दिली जाते असं देखील रणजीत कासले यांनी केलेल्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे. सध्या बीड मधील सोशल माध्यमांवर रणजीत कासले यांचा हा व्हिडिओ चांगलाच वायरल होत आहे. रंजीत कासले हे बीडच्या सायबर विभागात पोलीस निरीक्षक होते. मागील काही दिवसांपूर्वी त्यांना निलंबित करण्यात आलं. त्यानंतर त्यांनी अनेक दावे त्यांच्या सोशल माध्यमातून केले आहेत.

आता वाल्मीक कराड याच्या एन्काऊंटर बद्दल केलेल्या दाव्यामुळे खळबळ उडालीय. अक्षय शिंदेचा एन्काऊंटर हा फेक होता. त्यासाठी एसआयटी नेमली जाणार आहे. पण त्यातून काही होणार नाही. एसआयटी नेमायची असल्यास ती केंद्राची नेमा असंही कासले याने या व्हिडीओत म्हटलं आहे.



वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफरही आपल्याला देण्यात आली होती. त्यावेळी आपण सायबर विभागात होतो. असे बोगस एन्काऊंटर करण्या आधी पूर्ण तयारी केली जाते. मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री गृहसचिव यांची गुप्त बैठक होते. त्यानंतर पाच सहा जणांची टीम निवडली जाते असं ही त्याने या व्हिडीओत सांगितलं आहे.

या टीममध्ये विश्वासातील माणसे घेतली जातात. त्यांना मोठ्या रक्कमेचे अमिष दाखवले जाते. पुर्ण पोलिस सेवेत जेवढे पैसे मिळत नाहीत तेवढे पैसे त्यांना दिले जातात. शिवाय चौकशीत ही निर्दोष ठरवण्याचे आश्वासन दिले जाते. खात्यात परत घेण्याचे आश्वासन ही दिले जाते. असं ही ते या व्हिडीओत सांगतात. या व्हिडीओत त्यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोपही केले आहेत. ते बीडला घाबरतात. त्यांनी गृहमंत्री म्हणून काही काम केले नाही असा आरोप ही त्यांनी यावेळी केली आहे.

# समाज एकता मनसे चषक २०२५ चा मानकरी ठरला

## कुणबी समाजाचा भूमिपुत्र फायटर्स संघ

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१४, गुहागर (शृंगारतळी):** कोकणच्या क्रीडा विश्वात लक्ष लागून राहिलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी संकल्पित सौजन्याने गुहागर विधानसभा मतदारसंघ मर्यादित समाज एकता मनसे चषक २०२५ एक समाज एक संघ




गुहागर तालुक्यात प्रथमच ही भव्य दिव्य क्रिकेट स्पर्धा गुहागर मनसेच्या वतीने दिनांक ११ ते १४ एप्रिल २०२५ रोजी गोल्डन पार्क (जाणवले फाट्याच्या समोर) शृंगारतळी येथे मोठ्या जल्लोषात संपन्न झाली. सदर स्पर्धेत एकूण १२ समाज संघानी सहभाग घेतला होता.

ह्यामध्ये कुणबी समाजाचा संघ भूमिपुत्र फायटर्स हा संघ विजेता ठरला असून एक लाख प्रथम पारितोषिकचे भूमिपुत्र संघ मानकरी ठरला आहे. सदर स्पर्धा मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली, स्पर्धेला गुहागर विधानसभा मतदारसंघातील विविध राजकीय पक्षाचे प्रतिनिधीं सह गुहागर तालुक्यातील समाज अध्यक्ष, समाज नेते यांनी मोठ्या संख्येने सदिच्छा भेट देऊन उत्साह वाढला होता दरम्यान ह्या क्रिकेट स्पर्धेला गुहागर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार भास्करराव जाधव, मनसे नेते वैभव खेडेकर, मनसे जिल्हा अध्यक्ष संतोष नलावडे, माजी आमदार विनय नातू, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, प्रशांत शिरगावकर, बळीराज सेनेचे जिल्हा अध्यक्ष पराग कांबळे, भाजपा तालुका अध्यक्ष निलेश सुर्वे, सचिन कदम, आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सदिच्छापर उपस्थिती लावली होती.

सदर स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मनसेचे उपजिल्हा अध्यक्ष विनोद जानवळकर, तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर, समीर जोयशी, जितू साळवी, आदी मनसेच्या पदाधिकारी आणि मनसे सैनिकांनी अथक परिश्रम घेतले.

सदर स्पर्धेला सूत्रसंचालक,समस्त समाज बांधव, पोलीस यंत्रणा, पत्रकार तसेच हस्ते परहस्ते सहकार्य लाभले असे सर्वांचे आयोजक/उद्योजक तसेच मनसे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी आभार मानले आहेत.

# एका नव्हे, अनेक पुरुषांशी पत्नीचे प्रेमसंबंध...

पत्नीचे विवाहबाह्य संबध. त्यात एक नाही तर अनेक पुरुषां बरोबर हे संबंध होते. ते ही गावातल्याच पुरूषां बरोबर.याची माहिती बाहेर गावी कामाला असलेल्या पतीला लागली. त्यानंतर या प्रकरणाने एक भयंकर वळण घेतले. आपला भांडा फोड झाला आहे याची कुणकुण पत्नीला लागली. त्यानंतर तिने आपल्या साथिदारांसह असा काही कट रचला की पोलिसही हैराण झाले. या घटनेनं एकच खळबळ उडाली आहे. सर्वांना हादरवून सोडणारी ही घटना बिहारच्या बांका जिल्ह्यात घटली आहे.

पोलिसांनी काही दिवसापूर्वी एका व्यक्तीचा मृतदेह सापडला होता. त्या मृतदेहाचं मुंडकं शरीरा वेगळं केलं होतं. रामपूर गावा जवळ असलेल्या एका नाल्या शेजारी हा मृतदेह सापडला होता. त्यानंतर पोलिसा तातडीने घटनास्थळी पोहोचले होते. त्यांनी चौकशी सुरू केली. त्यानंतर मृतदेह हा बिहारी यादवचा असल्याचे स्पष्ट झाले. त्याने घातलेले कपडे आणि त्याच्या जवळ सापडलेल्या सामानावरून त्याची ओळख पटली.

पण त्याचा खून कुणी केला? मुंडकं शरीरा वेगळं कुणी केलं? हा प्रश्न पोलिसां समोर होता. याबाबत बिहारीची



पत्नी रिंकु कुमारीची चौकशी करण्यात आली. त्यावेळी काही धक्कादायक माहिती पोलिसांना मिळाली. तिने सांगितले की ६ एप्रिलला आपला पती कोलकातावरून निघाला होता. तो त्याच दिवशी पुनसिया पोहचला होता. तो पर्यंत त्याच्या बरोबर बातचीत झाली होती. पण त्यानंतर त्याच्या बरोबर कोणताही संपर्क झाला नाही. असं तिने पोलिसांना सांगितलं.

पोलिसांनी तिची आणखी चौकशी केली. त्यात तिचे गावातील अन्य पुरूषां बरोबर प्रेमसंबंध होते ही बाब समोर आली. याची माहिती तिचा पती बिहारी यादव याला समजली. त्याने त्यानंतर तिला मारहाण केली. ही मारहाण सतत होत होती.

शिवाय तिला तो दर महिन्याचे खर्च करण्याचे पैसे ही देत नव्हता. त्यामुळे तिच्या मनात त्याच्याबद्दल राग निर्माण झाला होता. त्यामुळेच तिने आपल्या सहकाऱ्यांसह पतीचाच काटा काढण्याचा कट रचला.

त्यानुसार रिंकु कुमारीने आपले सहकारी बालेश्वर हरिजन आणि बिजुला देवी यांच्या बरोबर मिळून पतीच्या हत्येचा कट रचला. त्यासाठी तिने बालेश्वर हरिजन याला हत्येसाठी ३५ हजार रुपयांची सुपारी दिली. त्यानंतर ११ एप्रिलला त्याने धारधार चाकूने बिहारी याचा गळा कापून त्याची हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह नाल्यात फेकून दिला. या प्रकरणी रिंकु कुमारी, बालेश्वर हरिजन आणि बिजुला देवी यांना अटक केली आहे. त्यांनी आपला गुन्हा ही कबूल केला आहे. हत्या करण्यात आलेला चाकू, रिंकू कुमारीचे रक्ताचे कपडे आणि खून झाला त्याचा मोबाईल पोलिसांनी जप्त केला आहे.

# संपादकीय



## जयंती सोहळा...

अगदी मार्च महिन्याच्या अगोदर पासूनच विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसोहळ्याचे


वेध लागलेले असतात.समस्त आंबेडकर अनुयायी जनता आपापल्या गावात,नगरात आणि वार्डात बैठक घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळाची स्थापना करतात.अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव,कोषाध्यक्ष व इतर सदस्यांची निवड झाली की बाबासाहेबांची जयंती मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरा करण्याकरता सगळे उत्साहाने कामाला लागतात.एप्रिल महिना उजाडला की मग जयंती मंडळाची धावपळ सुरू होते. जयंतीची तयारी करताना सगळी आंबेडकरी जनता अगदी लहान थोर मंडळी आपापली जबाबदारी पार पाडायला पुढे सरसावतात.

आणि उद्याच १४ एप्रिल आहे म्हटले की सारे वातावरण कसे प्रफुल्लित आणि रोमहर्षक होऊन जाते. असे वातावरण प्रत्येक गावात व प्रत्येक नगरात असते.

हे खरे आहे की दरवर्षी परदेशात आणि भारतातील प्रत्येक गावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येते. कारण गावकुसाबाहेर काट्याकुपाट्यात गुलामीचं आणि दरिद्री जीवन जगणाऱ्या,जातीयतेचे चटके सोसणाऱ्या सर्व सामान्य पिडित जनतेला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी रक्ताचा एक थेंब ही न सांडता सामाजिक क्रांती घडवून गावाच्या हद्दीत मान सन्मानासह आणून बसविले.ज्या जन समुदायाला जनावरांपेक्षाही हीन वागणूक दिली जात होती,ज्यांचा पदोपदी अपमान केला जायचा, ज्यांना गुलाम म्हणून वागवले जायचे त्या जनसमुदायाला बाबासाहेबांनी जातीयतेच्या जोखडातून मुक्त केले आणि माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला.हे बाबासाहेबांचे उपकार आपण कधीच विसरू शकत नाही. कृतज्ञता म्हणून आणि बाबासाहेबांच्या उपकारांची जाणीव ठेवून आपण दरवर्षी १४ एप्रिलला त्यांचा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करतो. परंतु,हळूहळू बाबासाहेबांच्या जयंती सोहळ्याचे स्वरूप बदलत चालले आहे.सकाळी पंचशील झेंड्याचे ध्वजारोहण केल्यावर, त्रिशरण पंचशील ग्रहण केले जाते. काही गावांत भाषणांचा किंवा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला जातो.पण आंबेडकरी विचार ऐकायला किमान सगळी आंबेडकरी जनता उपस्थित राहत नाही ही फार मोठी शोकांतिका आहे.याउलट,दुपारी मिरवणूक सुरू झाली आणि डीजेचा किंवा डॉल्बीचा आवाज घुमू लागला की मिरवणुकीत नाचायला सगळे झाडून गोळा होतात.महामानवांच्या जयंती सोहळ्यात जमेल तसे वेडेवाकडे नाचणे एक परंपरा बनली आहे.मिरवणुकीत डीजे किंवा डॉल्बी नसेल तर जयंती सोहळा फिका पडतो असे म्हणणारे आंबेडकरी अनुयायी जयंती सोहळ्याकडे फिरकत सुद्धा नाहीत.म्हणजे बाबासाहेबांचा जयंती सोहळा काही गोष्टींसाठी आपण मर्यादित करत आहोत. जयंतीचा बहुतांश खर्च हा डीजे किंवा डॉल्बी सिस्टीम साठी खर्च केला जात असेल आणि नाचण्याची हौस पुरवून घेतली जात असेल तर असा जयंती सोहळा काय कामाचा?

बाबासाहेब जागतिक कीर्तीचे ज्ञानसूर्य आहेत,मानवमुक्तीचे महामानव आहेत,भारतीय संविधान निर्माते आहेत,थोर विचारवंत आणि ग्रेट अर्थतज्ञ आहेत.त्यांनी तथागत गौतम बुद्ध,संत कबीर आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरू मानले व भारतात सामाजिक क्रांती घडवून आणली. अशा या थोर महामानवाचा जयंती सोहळा कसा प्रेरणादायी व्हायला पाहिजे पण आपण त्याकडे गांभीर्याने कधीच लक्ष देत नाही.बाबासाहेबांच्या जयंती दिवशी सगळेजण एकत्र या. एकमेकांच्या अडचणी सांगा, मुलांच्या शिक्षणासाठी काय अडचणी येत आहेत,आपली मुले उच्च शिक्षणाची कास का सोडून देत आहेत आणि वाढती व्यसनाधीनता यावर चर्चा करा. आपली मुले व्यसनी बनणार नाहीत यासाठी आणि शिक्षणाच्या प्रवाहात आपल्या मुलांना टिकवून ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यासाठी सांगोपांग चर्चा करा. बाबासाहेबांच्या जयंती दिवशी आपल्या मुलांमुलींना अठरा तास अभ्यास करण्यासाठी प्रेरित करा. संविधानाचे सामुदायिक वाचन ठेवा,बाबासाहेबांनी लिहिलेली पुस्तके वाचनासाठी द्या.पुस्तके वाचनानंतर त्याचे सार व त्यातील विचार लिहून काढायला सांगा. भाषणस्पर्धा घ्या.त्यात बाबासाहेबांचा व रमाई आंबेडकरांचा जीवनसंघर्ष यांचा समावेश करा.जयंतीवर वारेमाप खर्च न करता उरलेला पैसा गरीब परंतु हुशार मुलांच्या शिक्षणासाठी द्या.अशाप्रकारे बाबासाहेबांचा जयंती सोहळा प्रेरणादायी करता येईल.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना कोटी कोटी वंदन!

# १५ एप्रिल- जागतिक कला दिन








एप्रिल रोजी प्रसिद्ध कलाकार लिओनार्डो दा विंची यांच्या वाढदिवसानिमित्त जागतिक कला दिन साजरा केला जातो. लिओनार्दो दा व्हिंची हे प्रबोधनयुगातील अष्टपैलू व्यक्तीमत्त्व मानले जाते. तो अनेक शास्त्रे व कलांमध्ये पारंगत होता. शिल्पकला, स्थापत्यकला, गणित, अभियांत्रिकी, संगीत, खगोलशास्त्र यांसारख्या विविध विषयांवर त्याचे प्रभुत्व असले तरी तो चित्रकार म्हणून जगप्रसिद्ध ठरला. आपली चित्रे वास्तववादी बनावित यासाठी त्यांनी शरीर शास्त्राचा अभ्यास केला. मानवी चेहरे व शरीर कृतींवर त्याने मनापासून प्रेम केले. त्यांच्या मोनालिसा व द लास्ट सफर या चित्राकृती अजरामर ठरल्या लिओनार्डोची सर्वोत्कृष्ठ समजली जाणारी, प्रचंड गाजलेली जगप्रसिद्ध कलाकृती म्हणजे 'मोनालिसा'च चित्र. मोनालिसाच्या चेहऱ्यावरचे स्मित आजही भल्याभल्यांना कोड्यात टाकत. फ्रान्सेस्को दि बतोर्लमिओ डेल गीओकोन्डो नावाच्या एका व्यापाराच्या मोनालिसा उर्फ मैडोना लिसा नावाच्या चोवीस वर्ष्याच्या वर्ष्याच्या बायकोच हे चित्र होत. लिओनार्डो ने काढलेल्या 'म्याडोना ओन दि रॉकस', 'लास्ट सपर' आणि 'मोनालिसा' यांसारख्या मोच्क्या चित्रांनी त्याचं नाव जगात अजरामर झाल.आंतरराष्ट्रीय कलाकारांच्या कार्याकडे आणि अस्तित्वात असलेल्या सर्जनशील अभिव्यक्तीच्या मार्गांकडे जगभरात लक्ष वेधण्यासाठी आंतरराष्ट्रीय कला संघटनेने हा दिवस स्थापन केला होता. राष्ट्रीय कला दिन सर्व प्रकारच्या कला साजरे करतो, लोकांना त्यांच्या कलात्मक आवडी वाढवण्यास आणि त्यांना माहित नसलेल्या कलात्मक माध्यमांना जाणून घेण्यास प्रोत्साहित करतो.

राष्ट्रीय कला दिनाचा इतिहास

इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ आर्ट (IAA) ने त्यांच्या १७ व्या महासभेत एक प्रस्ताव मांडल्यानंतर १५ एप्रिल २०१२ रोजी जागतिक कला दिनाची स्थापना केली. ललित कलांचा उत्सव साजरा करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्जनशील क्रियाकलापांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना एक दिवस तयार करायचा होता. इतिहासातील सर्वात प्रसिद्ध कलाकार आणि शोधकांपैकी एकाच्या सन्मानार्थ, लिओनार्डो दा विंचीचा वाढदिवस ही तारीख निवडण्यात आली. अमेरिकेतील पहिला अधिकृत जागतिक कला दिन उत्सव २०१५ मध्ये लॉस एंजेलिस येथे आयोजित करण्यात आला होता. तेव्हापासून येथे स्मारके साजरी केली जात आहेत. जागतिक कला दिन उत्सव देशभर पसरवण्याच्या उद्देशाने २०१७ मध्ये IAA च्या अमेरिकन शाखेची स्थापना करण्यात आली. २०१९ मध्ये, युनेस्को जनरल कॉन्फरन्सच्या ४० व्या सत्रादरम्यान, जागतिक कला दिन अधिकृतपणे युनेस्को साजरा म्हणून घोषित करण्यात आला आणि इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ आर्टला युनेस्कोचा एनजीओ भागीदार बनवण्यात आले. कला आपल्या जीवनात खूप महत्त्वाची भूमिका बजावते, आपल्याला त्याची जाणीव असो वा नसो. ती सर्जनशीलता, विविधता आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन देते आणि लोकांना त्यांच्या आवडींबद्दल संभाषण सुरू करण्यास आणि एकमेकांशी ज्ञान सामायिक करण्यास प्रोत्साहित करते, क्षितिजे उघडते आणि आपल्याला वेगवेगळ्या प्रकारे गोष्टींकडे पाहण्यास भाग पाडते. बरेच लोक कलाकृतींना चित्रकला किंवा शिल्पकला यासारख्या ललित कलेशी जोडतात. प्रत्यक्षात, कला सतत विकसित होत असते आणि ती दृश्य स्वरूपात असलेली कोणतीही गोष्ट आहे जी कोणीतरी त्यांच्या कल्पनाशक्ती आणि सर्जनशील कौशल्यांचा वापर करून तयार केली आहे. जागतिक कला दिनाचे उद्दिष्ट जगभरात कला आणि कलात्मक अभिव्यक्तीचा प्रसार करणे, नवीन कलाकारांना ओळख मिळवून देणे आणि कला सर्वांना उपलब्ध करून देणे आहे.

**- लेखक -**
**श्रीराम महाजन**
**कलाशिक्षक चेंबूर**
**कर्नाटक हायस्कूल, चेंबुर. मुंबई**

# मराठी गझलचे अनभिषिक्त सम्राट कवि सुरेश भट !

माणूस सहवासातूनच माणूस बनतो. कधी-कधी तर छोटीशी भेट देखील जीवनाचं आयामच बदलून टाकते. माणूस मरतो परंतू त्यांचे विचार मरत नसतात, ते त्यांच्या कार्यशैलीमुळे जीवित असतात. हे अधोरेखित सत्य आहे. वरपांगी अत्यंत अस्ताव्यस्त दिसणारा हा कवी, त्यांची ती कविता आणि त्यांचे ते गाणे हे तिन्ही घटक त्या कवितेच्या संपूर्ण आस्वादाला आवश्यक असावेत असे वाटायला लागते.हे एक विलक्षण अद्वैत मिश्रण आहे. त्यांची कविता ऐकताना किंवा वाचताना सुरेश भट नावाचा एक मस्त कलंदर माणूस निराळा काढता येत नाही.

माझ्या सुदैवाने सुरेश भटांसारख्या सिध्दहस्त प्रतिभावंत कविचा स्नेह मला लाभला. त्यांचा तो बेडरपणा, दिलदारपणा, हळवेपणा, लोभसवाणा होता, कारण कविते-इतकेच त्यांचे कविता ऐकणाऱ्यावर, जीवनातल्या व्यवहारी धडपडीपलीकडे काही पाहू इच्छिणाऱ्यांवर, ते जाणून घेण्याची तळमळ असणाऱ्यांवर, माणसांच्या चांगुलपणावर प्रेम होते. साधीसुधी ही माणसे माझ्या कवित्वाची धनी असे ते केवळ उपचार म्हणून म्हणत नाहीत. त्या साध्यासुध्या माणसांशी साधायच्या संवादाचे त्यांना मोल मोठे वाटायचे. ओळखण्याची त्यांची हातोटी वेगळीच होती. सान असो वा मोठा सगळे सारखेच, त्यांच्या प्रेमात फारकत नव्हती. तेव्हा त्यांनी साप्ताहिक बहूमत नावाचे वर्तमानपत्र सुरु केले, त्यात माझा, जैमिनी कडु यांचा सहकारी म्हणून समावेश होता.

कविला माणसेच कवी म्हणून जगवतात व शिल्लक ठेवतात. कवी हा लिहिणारा माणूस असतो आणि बहुधा जीवन असे असते की ते कविला मनाप्रमाणे लिहू ही देत नाही अन् जगू ही देत नाही. या जगात असच चालतं. कवितेच्या प्रांतात गझल सम्राट म्हणून कवी सुरेश भटांना असली आपुलकी लाभली, म्हणूनच तर नेहमी माणसांचा गोतावळा त्यांच्या अवतीभवती असायचा, त्यात मी सुध्दा सामील होतो. सजीव जो वरी लता देती, मरणा घेती खांद्यावरती जीवन असतांना किंमत नसते, मरणानंतर त्याची महती कळते. अशा या थोर कवीचं नागपूर नगरीच्या महानगरपालिकेने त्यांचं स्मारक म्हणून कविवर्य सुरेश भट सभागृह बांधुन औचित्य साधलं. परंतू शासनाकडून एखादा सत्कार किंवा 'डॉक्टरेट' वगैरे काहीही मिळाले नाही, त्याबद्दल अत्यंत वाईट वाटते. खरच ही शोकांतिका आहे. कवि सुरेश भटांची अनेक गीते चित्रपटासाठी आणि चित्रपटांशिवाय ध्वनिमुद्रित झालेली आहेत, त्यांच्या शब्दांना सुरसम्राज्ञी लता मंगेशकर, आशा भोसले, सुमन कल्याणपूर, देवकी पंडित, सुरेश वाडकर, अरुण दाते आणि नामवंत गायक-गायिकांचा सुरेख कंठ लाभलेला असून हृदयनाथ मंगेशकर, सी. रामचंद्र व बऱ्याच संगीतकारांचे त्यांच्या गीतांना संगीत लाभलेले आहे. त्यामुळे त्यांच्या अनेक अविस्मरणीय रचना आजही अजरामर झालेल्या आहेत. ते हयात नसले तरी त्यांनी वेळोवेळी केलेले प्रामाणिक प्रयत्न कधीही विसरता येणे शक्य नाही. कविवर्य सुरेश भटांचे ऋण कधीच फिटणार नाहीत. तेव्हा त्यांच्या ऋणांच्या ओझ्यात राहायला मला आवडेल!

**कविश्रेष्ठ सुरेश भटांच्या ९३ व्या वाढदिनानिमित्त त्यांच्या चिरंजीव स्मृतींना मानाचा मुजरा!!**

**- प्रभाकर सोमकुवर**
**नागपूर, ९५९५२५५९५२**

## सद्धियोगी..

अफवा राक्षसीप्रवृत्ती
भडकावत राहे आगी
उद्रेकहोई जागोजागी
असूरी सुख उपभोगी

घाम गाळू कमाई करे
अव्याहत ते कर्मयोगी
क्षणी राखरांगोळी करे
रे उपटसुंभ निरूद्योगी

आक्रोश तर कैक करे
फिर्यादी जे अभियोगी
साठमारीत जन भरडे
सत्ताधारी सत्ता भोगी

दोष देतात नशिबाला
ग्रहदशा अति कुयोगी
अन्याय करतो दुसरा
समजे स्वतासअभागी


कठोर कडक शासन
करावे समाज निरोगी
हाक मारता आर्तपणे
मिळे अनेक सहयोगी

सहन न होत ही दंगल
पुढे यावेत अभियोगी
जन मालमत्ता रक्षिता
कामे व्हावी सद्धियोगी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# संतकवी श्रीधर स्वामींना विनम्र अभिवादन !



श्रीधरकवी ब्रह्मानंद नाझरेकर हे इ.स.१७व्या शतकातील एक प्रसिद्ध आख्यानकवी होते. पंढरपूराहून ५० किलोमीटर अंतरावर असलेले नाझरे हे त्यांचे मूळ गाव होय. हे काशीच्या आनंद संप्रदायातले आठवे वंशज होत.

त्यांचा जन्म इ.स.१६५८च्या आसपासचा असावा असे सांगितले जाते. यांचे घराणे मंगलाईतील खडकी येथील असल्याने त्यांचे आडनाव खडके होते. पुढे यांच्या घराण्यातील एक पुरुष घोडदळात अधिकारी बनल्याने त्यानी घोडके आडनाव घेतले. त्यानंतर राघोपंत नाझरे महालाचे कुलकर्णी झाल्यावर त्यांनी नाझरेकर आडनाव घेतले. श्रीधरांचे वडिलांचे नाव ब्रम्हानंद आणि आईचे नाव सावित्री होते. श्रीधर हे इ.स.१६७८मध्ये आपल्या वडिलांसोबत पंढरपूर क्षेत्री आले. येथेच त्यांचे पुराणे, पंचकाव्ये, रामायण, भागवत आदी ग्रंथाचे अध्ययन झाले व संतकवींची कविताही त्यांनी वाचली. वडिलांकडून अनुग्रह घेतल्यानंतर स्वामींनी आनंद संप्रदायाच्या प्रसाराचे कार्य सुरू केले. याच काळात त्यांनी एकूण ५८ हजारावर ओळींचे ११हून अधिक काव्यग्रंथ रचले. संतकवी श्रीधरस्वामी नाझरेकरांनी लिहिलेले काही ग्रंथ असे आहेत- अंबिका उदय, पांडवप्रताप, पांडुरंग माहात्म्य, मल्हारी माहात्म्य, रामविजय, व्यंकटेश माहात्म्य, शिवलीलामृत, हरिविजय, ज्ञानेश्वर चरित्र आदी.

संतकवी श्रीधरस्वामी हे मराठी काव्याच्या महोदय पर्वातील, सुवर्णकाळातील एक अग्रणी कवी होते. छत्रपती शाहूमहाराजांनी सातारा दरबारात त्यांचा मोठा सन्मान करून त्यांना एक गाव इनाम दिले होते. श्रीधरांचे घराणे योगी व पुराणिकांचे होते. समकालीन व उत्तरकालीन साधुसंतांनी श्रीधरांची अपार थोरवी गायलेली आहे. श्रीधरांची अफाट लोकप्रियता सर्वांनाच थक्क करणारी आहे अशा शब्दात महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल.भावे यांनी श्रीधर यांचा गौरव केलेला आहे. श्रीधरस्वामी नाझरेकरांनी लिहिलेल्या शिवलीलामृत या ग्रंथाला २३ फेब्रुवारी २०१९ रोजी ३०० वर्षे झाली. काशी विश्वेश्वराच्या देवळात बसून त्यांनी हा ग्रंथ लिहिला. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील शिवभक्त या ग्रंथाची पारायणे करतात. शिवलीलामृतात १४ अध्याय असून एकूण २४५० ओव्या आहेत. सोवळ्याविना वाचता येईल असा, या ग्रंथाचा कोणताही विशिष्ट अध्याय वाचण्याचे बंधन नाही. शिवलीलामृताची भारतातील अनेक भाषांत भाषांतरे झाली आहेत. या ग्रंथाची अनेक प्राचीन हस्तलिखिते करण्यात आली होती. यातील काही नमुने भारत इतिहास संशोधक मंडळात आहेत.

भारतामध्ये छापखाना सुरू झाल्यानंतर म्हणजेच अंदाजे १८९२ सालापासून हा ग्रंथ छापील स्वरूपात मिळू लागला. शिवलीलामृतातील अकराव्या अध्यायाचे भारतभर मोठ्या प्रमाणात पठण केले जाते. चिंतामणी नीळकंठ जोशी हे मराठी भाषेत लिहिलेल्या या ग्रंथाचे आणि श्रीधरस्वामी यांच्याविषयीच्या इतिहासाचे अभ्यासक आहेत.

श्रीधरस्वामींचे शेवटचे वास्तव्य पंढरपुरात विठ्ठलाच्या मंदिराजवळ असलेल्या घरात होते. त्याच घरात सध्या (सन २०१९ साली) त्यांची नववी पिढी राहते आहे. त्यांच्याकडे श्रीधरस्वामींच्या हस्ताक्षरातील शिवलीलामृत आणि मल्हारी माहात्म्य या पोथ्या आजही जपून ठेवलेल्या आहेत. त्यांचे देहावसान इ.स. १७३०मध्ये चैत्र कृष्ण द्वितीयेस झाले, असे म्हटले जाते.

**!! संतकवी श्रीधरस्वामींच्या पावन पुण्यस्मरणा निमित लेखरुपाने विनम्र अभिवादन !!**

- संकलन व सुलेखन -
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## खारघर मध्ये भीषण पाणीटंचाई

### महिन्याकाठी टँकरसाठी लागतात लाखो रुपये...



**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**

**दि.१४ खारघर (नवी मुंबई) :** खारघर परिसरात पाण्याची भीषण समस्या निर्माण झाली आहे. आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी रोज अडीच ते तीन हजार रुपये खर्च करून खाजगी टँकर आणावा लागत असल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. शिवाय या पाण्यामुळे नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सिडको ने खारघर मधील पाणीटंचाई दूर करावी. अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे. याविषयी कार्यकारी अभियंता व्ही. बी. गायकवाड यांच्याशी संपर्क केला असता होऊ शकला नाही. खारघर मधील सेक्टर ३४ आणि ३५ हा परिसर उच्चभ्रू वस्ती म्हणून ओळखला जातो. गेल्या ६-७ महिन्यापासून क्रिशन हाईट जियाना भूमी त्रिवास रोज साईप्रसाद सिमरन एक्रम हेरिटेज सुजाता, जय गणेश, अरिहंत अनया, क्रिशन हाईट अशा अनेक सोसायटीत कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. सिडकोकडे पत्रव्यवहार करूनही कोणत्याही प्रकारची उपाययोजना केली जात नसल्यामुळे पाण्यासारखा मूलभूत सुविधेसाठी नागरिकांना झगडावे लागते. सिडको कडून रोज ३०ते ४० मिनिटे पाणी उपलब्ध होते. तोही कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी खाजगी टँकरचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. दूषित पाण्यामुळे रहवासी आजारी पडत आहेत. सिडकोकडे पत्रव्यवहार करूनही कोणत्या प्रकारची उपाययोजना केली जात नाही असे निदर्शनास आले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जि.परिषद ठाणे येथे अभिवादन कार्यक्रम



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, ठाणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हा परिषद, ठाणे येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाज कल्याण विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे आणि लेखाधिकारी (२) रविंद्र सपकाळे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सूपा बस स्थानकासमोर पाणपोई सुरू !




**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१५, सुपा (अहिल्यानगर) :** पूर्वीच्या काळी घराबाहेर पडल्यानंतर लाल रंगाच्या फडक्याने झाकून ठेवलेले रांजण, माठ, त्यावर लाकडी झाकण आणि पाणी पिण्यासाठी रंगीबेरंगी प्लास्टिक ग्लास असलेली पाणपोई शहरात अनेक ठिकाणी दिसत होत्या, उन्हाळ्यात शहरात व खेड्यात तापमानात वाढ झाली असून, उन्हाळ्याची चांगलीच चाहूल लागली आहे, रस्त्यावरून जाणाऱ्या, येणाऱ्यांची तहान भागविण्यासाठी पूर्वी पाणपोईची सुविधा सुरू केली जायची. सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून अनेक संस्था-संघटना आणि दानशूर व्यक्ती स्वखर्चाने अशा पाणपोई सुरू करायच्या मात्र गेल्या काही वर्षांत त्यां बंद झाल्या आहेत. सुपा गावातील सामाजिक कार्यकर्ते जनसेवक किशोर भाऊ जाधव यांनी महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने सुपा गावात सुपा बस स्थानकासमोर पाणपोई चालू केली आहे. सुपा गावात बुधवारचा बाजार असल्यामुळे खूप गर्दी होती. यानिमित्त किशोर भाऊ जाधव यांनीपाणपोई चालू केली आहे. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. उद्धाटन प्रसंगी सूपा पोलीस स्टेशनचे झडख सोमनाथ दिवटे साहेब, उद्योजक विनोद गाडीलकर. सरपंच योगेश शेठ रोकडे, सागर आबा मैड, दत्ता नाना पवार, पत्रकार शिवशंकर शिंदे, सागर गायकवाड, अभि येणारे. शिवा भाऊ सोनवणे, मधुकर पठारे साहेब, दादा जाधव, प्रकाश धोत्रे पत्रकार रोहित मेमाणे हे उपस्थित होते.

## भारतीय इतिहास आणि संस्कृती यांचे दर्शन घडवणारा ज्ञानकुल संस्थेचा 'ज्ञानोत्सव' संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, मुंबई :** शालेय अभ्यासक्रमासोबत विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, विविध कला आणि साहित्य यांचे शिक्षण देणाऱ्या ज्ञानकुल संस्थेचा तीन दिवशीय ज्ञानोत्सव चेंबूरमधील बाल विकास संघ येथे १० ते १२ एप्रिल या कालावधीत पार पडला.

'अखंड भारत' या संकल्पनेच्या अंतर्गत एकात्मता स्तोत्रावर आधारित या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले प्रकल्प मांडण्यात आले होते. ज्याची माहितीही विद्यार्थी उत्साहाने देत होते. या प्रदर्शनातून अखंड भारतातील विविध उपखंडांतील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक वारसाचे दर्शन घडवण्यात आले. भारताच्या



इतिहासातील उल्लेखनीय घटनांचे चित्रणही या प्रदर्शनातून करण्यात आले होते. भारतातील राजे-महाराजे, साधू-संत, क्रांतिकारक, वीरांगना, प्राचीन ग्रंथ साहित्य यांविषयीची सचित्र माहिती याठिकाणी मांडण्यात आली होती. पुरातन चलने, नाणी, शिवकालीन अस्त्र-शस्त्र प्रदर्शनात मांडण्यात आले होते. अखंड भारतातील प्रसिद्ध नद्या, पर्वत, तीर्थक्षेत्रे, शक्तिपीठे, ऐतिहासिक कला आणि साहित्य यांवर आधारित प्रकल्प विद्यार्थ्यांनी तयार केले होते ज्याला तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली होती. ऐतिहासिक ज्ञानावर आधारित विद्यार्थ्यांनी तयार केलेली कोडी प्रदर्शन पाहणाऱ्यांचे कुतूहल वाढवत होती. यावेळी ज्ञानकुलच्या विद्यार्थ्यांनी लाठीकाठीची प्रात्यक्षिके, भजने आणि शौर्यगीते सादर केली. बिल्लाबोंग इंटरनॅशनल शाळेचे चेअरमन सुधीर गोयंका, आर्यन एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन आमोद उसापकर, चेंबूरचे प्रसिद्ध सी.ए. तेगचंद गुप्ता आणि भारत विकास परिषदचे प्रचारक क्षितिज गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उदघाटन पार पडले.

दूरदर्शनवर गाजलेल्या 'महाभारत' मालिकेतील भीष्म पितामह यांची अजरामर भूमिका साकारणारे अभिनेते मुकेश खन्ना आणि इंडियन एक्सप्रेस आणि माय उडान ट्रस्टच्या संचालिका अनन्या गोयंका यांनी या प्रदर्शनाला आवर्जून उपस्थिती नोंदवली. अन्य शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, पालक, इतिहासप्रेमी, संशोधन प्रेमी तसेच शेकडो नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.

## संविधांनाच्या स्वप्नपूर्तीसाठी 'भारतीय' होण्याची गरज -डॉ. सुभाष वाघमारे



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१४, खंडाळा (सातारा) :** भारतीय संविधान हेच देशाचे कल्याणकारी तत्वज्ञान असून भारतीयांच्या सुखासाठी सर्वांनी त्याचे आचरण करण्याची गरज आहे. आज देशामध्ये धर्मांध शक्ती धर्माधर्मात, जातीजातीत भांडणे लावण्यासाठी नवनवीन इतिहासातले विषय काढून माध्यमातून द्वेष फैलाव करीत आहेत. लोकांना भ्रमिष्ट करण्याचे, उत्तेजित करण्याच्या घटना आज देशात घडवल्या जात आहेत. त्याने माणसांची मने फाटून अशांती निर्माण होणार आहे.

७५ वर्षात आपण देशात एकात्मता निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहोत,पण आज कुणी धर्माचे राष्ट्र उभे करण्याच्या गोष्टी करीत आहेत. अल्पसंख्यांक असलेल्याना त्रास देण्याचे प्रयत्न करीत आहेत. अशाने देशात आपसातले आपलेपण संपुष्टात येणार आहे. त्यामुळे, समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या कल्याणकारी तत्वांचा प्रसार करण्याची आणि जात, धर्म, लिंग, वंश यावरून भेदभाव थांबवण्याची गरज आहे.खरे तर आता संविधांनाच्या स्वप्नपूर्तीसाठी भारतीय होण्याची गरज आहे'असे आवाहन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या भाषा मंडळाचे प्रभारी संचालक व छत्रपती शिवाजी कॉलेजचे उपप्राचार्य प्रा.डॉ.सुभाष वाघमारे यांनी केले.

लोणंद येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीने व समता विचारी संघ आयोजित केलेल्या महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. या वेळी भन्ते धम्मानंद बोधी, बाळकृष्ण खरात, नंदकुमार खरात, अरुण वाघमारे, दत्तात्रय खरात, शैलजा खरात, निखील खरात, लोणंद रेल्वे जंक्शन स्टेशन प्रबंधक हिरामण रामटेके, खरात, सुनील खरात, विद्याधर कांबळे, प्रा.अमीर इनामदार, गणेश भालेराव, सुनील अण्णा खरात, संतोष खरात अक्षय दगडे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.वाघमारे म्हणाले-बुद्धापासून ते आजपर्यतच्या विचारधारेचा वेध घेताना ते म्हणाले की देशात दोन विचारधारा आज आहेत. त्यातल्या काहीना आपला धर्म हाच सर्वश्रेष्ठ वाटतो.विषमता, जातीभेद, धर्मभेद, तसेच राहावेत, आपले परंपरेने चालत आलेले श्रेष्ठत्व तसेच राहावे, वर्चस्व तसेच राहावे असे वाटते. बांगला देशासारखे भारत हे धर्माचे राष्ट्र व्हावे असे तिला वाटते. त्यासाठी वेगवेगळ्या कपोल कल्पित कल्पना पसरवून, सतत आक्रमक पवित्रा घेऊन काहीतरी धाक निर्माण होईल, भीती निर्माण होईल अशी विधाने केली जातात. अल्पसंख्याक असलेल्या धर्मियांना त्रास देण्याच्या घटना घडविल्या जातात असे सर्वसाधारण आपल्याला दिसते, तर दुसरी विचारधारा समतेच्या मार्गाने जाणारी आहे.तिला संविधान महत्वाचे वाटते. खरेतर बुद्धांच्या काळापासून हे दोन प्रवाह उघडपणे वाहताना दिसतात. बुद्धांनी ज्ञान घेण्याचा अधिकार सर्वांना आहे असे सांगून अप्रत्यक्ष चातुर्वर्ण्य व्यवस्था नाकारली आहे. ईश्वराबद्दल काहीही प्रतिक्रिया न देता त्यांनी धम्म हा सर्व मनुष्याचा हिताचा मंगल मार्ग असल्याचे सांगितले.

सर्वांनी चांगले चारित्र्य ठेवावे, हिंसा करू नये, शील चांगले ठेवावे, ज्ञान घ्यावे, आळसी न राहता उद्योगी व्हावे, मैत्री भावनेने एकमेकाला जपावे, बंधुता जपावी, स्वच्छ राहावे, निर्व्यसनी रहावे, प्राणीमात्र सृष्टी यांची काळजी घ्यावी. बहुजनाचे हित होईल असे वर्तन करावे असे बुद्धाने सांगितले. माणसे तोडण्यापेक्षा माणसे जोडण्यावर बुद्धानी भर दिला. सर्वांच्या हितासाठी करुणाशील होण्यासाठी सम्यक विचार आणि आचार सांगितला. पुढे सम्राट अशोकाने हा सर्वांच्या कल्याणाचा विचार जगभरात पोहचवला. बुद्धाच्या अनुयायांनी अहिंसेने, विचाराने माणसे चांगली व्हावीत असे प्रयत्न केले.पण स्वार्थी, मतलबी लोकांनी आपले वर्चस्व रहावे म्हणून बुद्धाला तसेच त्यांच्या अनुयायांना देखील त्रास दिला. महात्मा फुले यांना इंग्रजांचे राज्य असताना जाणवले की देशातील धर्माचे नाव घेणारे लोक लोकांना मानसिक गुलामगिरीत ठेवत आहेत. भ्रम पसरवत आहेत, खोटे बोलत आहेत, शोषण करीत आहेत, अंधश्रद्धा पसरवत आहेत.आणि आपल्याच देशातील माणसाना शिक्षण घ्यायला बंदी घालत आहेत. म्हणूनच जोतीराव फुले व सावित्रीबाई यांनी मुलींसाठी ,अस्पृश्यासाठी सर्वांसाठी शाळा सुरु केल्या.असत्य सांगणाऱ्या लोकांची चिकित्सा करण्यासाठी सत्यशोधक धर्म स्थापन केला. धर्माने ज्यांना हीन ठरवले त्यांना न्याय देण्यासाठी जोतीरावानी आपले आयुष्य दिले,ग्रंथ लिहिले,चळवळी सुरु केल्या.अज्ञान दूर करण्यासाठी महात्मा फुले यांनी बुद्धाचे कार्य प्रत्यक्ष कृतीत आणले. त्यांच्या ग्रंथांनी आणि कार्याने लोकांना डोळस दृष्टी मिळाली.मानवी हक्काची जाणीव त्यांनी करून दिली. बाबासाहेब यांनी शिक्षण घेऊन अन्याय दूर करण्यासाठी संघर्ष सुरु केला.त्यांच्या वैचारिकतेने वंचित असलेल्या सर्व बहुजन समाजाला न्याय मिळाला.या विचार धारेने न्याय, समता, स्वातंत्र्य यांचा उद्धोष केला.भारतीय संविधान निर्मिती करताना सर्वाना एकसारखा न्याय,हक्क या गोष्टी आल्या. त्यामुळेच विषमता असलेला भारत आज समतेच्या दिशेने प्रवास करता झाला, पण आजही ज्यांना वर्चस्व गाजवावे वाटते अशा शक्ती समाजात आक्रमक होऊन भीती दाखवत आहेत.अशावेळी सर्व लोकांची एकजूट महत्वाची असून आपल्या पिढ्या ज्ञानी होतील आणि भारतात बंधुभाव निर्माण होईल असेच काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मारहाण, अत्याचार, बलात्कार हे वाढलेले असताना त्यावर नियंत्रण यावे यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत. फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील प्रसंग सांगून सर्वांनी शीलवान, ज्ञानी, समंजस राहून बंधुत्व वाढविण्यासाठी काम करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## रक्तदान शिबीर आयोजित करून डॉ.आंबेडकर जयंती साजरी



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१४, पंढरपूर :** गावांतर्गत युवक कार्यकर्ते आणि भीम सैनिकांनी तुंगत याठिकाणी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करून मोठ्या हर्षोउल्लासात साजरी केली. आकर्षक सजावट करून भीमनगर तुंगत येथे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेसह संपूर्ण जगाला शांतीचा मार्ग दाखवणाऱ्या भगवान गौतम बुद्ध, महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमांचे पुजन मान्यवरांचे हस्ते करून अभिवादन करण्यात आले. तुंगत जयंती उत्सव समितीच्या वतीने सोमवार १४ एप्रिल रोजी सकाळी भीमसैनिकांचे उपस्थितीमध्ये मान्यवरांचे स्वागत केले. ग्रामपंचायत सदस्य तथा उत्सव समिती मार्गदर्शक बत्तासराव वनसाळे व आण्णा वनसाळे यांनी प्रास्ताविक करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेसंदर्भातील विचार व्यक्त केले. यावेळी पंढरपूर तालुका पोलीस निरीक्षक मुजावर, गावच्या सरपंच डॉ.अमृता रणदिवे, उपसरपंच प्रकाश रणदिवे, माजी संचालक दिलीप रणदिवे, सदस्य नवनाथ (बापु) रणदिवे, पंकज लामकाने, अंगद रणदिवे, नारायण (बापु) रणदिवे, अनिल आतार, ग्रामसेवक पाटील, संचालक विठ्ठल (नाना) रणदिवे, तानाजी पाटील, डॉ. आबासाहेब रणदिवे, इंद्रजित रणदिवे, यांचे हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसूर्य ज्योतीबा फुले, भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.मा.ग्रा.पं.सदस्य वामन वनसाळे यांचे मार्गदर्शनाखाली मंडळाचे अध्यक्ष अण्णा वनसाळे प्रमुख कार्यकर्ते देवानंद सावंत, संदीप वनसाळे, किरण अवचारे, सुरज वनसाळे, निखिल वनसाळे, झुंजार वनसाळे, अविनाश वनसाळे, दत्ता वनसाळे, विकी अवचारे, विकास फडतरे, निशांत सावंत, संजय सावंत, सचिन वनसाळे, निलेश वनसाळे, प्रवीण वनसाळे, अंकुश वनसाळे, रवी गाडे, अमोल शिंदे, सिद्धार्थ वनसाळे, बापु वनसाळे, गणेश रणदिवे, स्वप्निल वनसाळे, संतोष अवचारे, सागर शिंदे, संतोष वनसाळे, तात्या वनसाळे, श्रीकृष्ण प्रक्षाळे, संभाजी वनसाळे, यांच्यासह भीम नगर मधील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

फटाक्याची आतिषबाजी करून भीम जन्माचे स्वागत : भीमजयंती निमित्त सोमवार १४ एप्रिल रोजी जयंती उत्सव समितीच्या वतीने मोठ्या प्रमाणावर फटाक्याची आतषबाजी करून भीम जन्माचे स्वागत करण्यात आले. या वेळी फटाक्यांच्या आतषबाजी आणि जय भीम चे जयघोषाने भीमसैनिकांनी जन्मोत्सव साजरा केला.

## गड किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत सरकार उदासीन - जयंत पाटील

> गड किल्लयांची दुरवस्था पहावत नाही छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्या गड - किल्लयांची दुरवस्था पहावत नाही. शासन फक्त घोषणा करते, कृती मात्र शुन्य होते. शिवरायांचा मावळा म्हणून हे किल्ले संवर्धन, स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. २६ मार्च पासून या मोहिमेला शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरी येथुन सुरुवात करण्यात आली राज्याच्या विविध भागातून युवकांचा मोठा सहभाग या मोहिमेला लाभत आहे. एकाच निरोपावर हजारो तरुण येथे जमा झाले आहेत.
>
> **- खासदार, निलेश लंके**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** राज्य सरकारचे जेथे प्रसिद्धी मिळते तेथेच केवळ लक्ष आहे. राज्यातील गडकोट किल्लयांच्या संवर्धनाकडे सरकारचे दुर्लक्ष आहे. अनेक गडकोट, किल्लयांकडे राज्य



सरकारने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. परंतु, तसे होताना दिसत नाही. राज्य सरकार किल्ले संवर्धनाबाबत उदासीन असल्याने आगामी अधिवेशनात आपण संवर्धनाची मागणी करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार जयंत पाटील यांनी सांगितले.

खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून गेल्या शिवजयंतीपासून राज्यातील गड -किल्लयांच्या स्वच्छता व संवर्धनाची मोहीम सुरू केली आहे. गेल्या शिवजयंतीदिनी त्यांनी शिवनेरी येथे मोहीम राबवली. काल, रविवारी बहादुरगड-धर्मवीरगड (ता. श्रीगोंदा) येथे मोहीम राबवण्यात आली. या गडावर छत्रपती संभाजी महाराज व कवी कलश यांनी अखेरचा संघर्षाचा काळ घालवला आहे. या मोहिमेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह राज्यातील अनेक ठिकाणचे तरुण सहभागी झाले होते. त्यावेळी पाटील पत्रकारांशी बोलत होते. राज्यातील गडकोट किल्लयांचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

धर्मवीरगड राज्य सरकारच्या ताब्यात आहे तर तेथील दोन पुरातन मंदिर केंद्र सरकारच्या ताब्यात आहे. या किल्लयाच्या संवर्धनासाठी आपण संसदेच्या अधिवेशनात लक्ष वेधू असे खासदार लंके यांनी सांगितले. मोहिमेत खासदार लंके यांच्यासह तरुण सहभागी झाले होते.

मोठ्या आकाराच्या डस्ट बिन प्लास्टिक व कचरा गोळा करण्यासाठी, कायमस्वरूपी ठेवण्यात आल्या. झाडांना रंगरंगोटी करण्यात आली, झाडांना पाणी घालण्यात आले.

# पनवेल मनपा मुख्यालयात संविधान उद्देशिकेचे अनावरण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, पनवेल :** महानगरपालिका मुख्यालयात संगमरवरी दगडावर कोरलेल्या संविधान उद्देशिकेचे अनावरण भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोमवार, दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, माजी महापौर डॉ.कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, सहाय्यक संचालक (नगररचना) केशव शिंदे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपयुक्त डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, मंगला माळवे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.



संविधानाची उद्देशिका ही भारतीय संविधानाच्या सुरुवातीला दिलेली एक महत्त्वाची भूमिका आहे. या उद्देशिकेमध्ये भारताच्या संविधानाची मूलभूत तत्त्वे, मूल्ये आणि ध्येय स्पष्टपणे नमूद केलेली आहेत. उद्देशिका ही आपल्या संविधानाचा आत्मा असून ती आपल्याला संविधानाचे मूलभूत मार्गदर्शक तत्त्व समजून घेण्यासाठी मदत करते. तसेच यावेळी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-३ अंतर्गत प्रभाग क्र.१९ मधील भू.क्र. ३१८ येथे भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यात आले आहे. या भवनाच्या बाह्य व अंतर्गत सौंदर्यीकरण यासह इतर अनुषंगिक कामांच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन आज रोजी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या आंबेडकर भवनात महापालिकेतर्फे ग्रंथालय चालवले जाते. या ग्रंथालयात स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी अहोरात्र अभ्यास करत असतात. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी वातानुकूलित यंत्रणेसह इतर सुविधा या कामांतर्गत करण्यात येणार आहेत. सदर आंबेडकर भवन सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त ठरेल. तसेच स्थानिक नागरिकांसाठी एक महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केला.

## पंचशील विद्यालयात डॉ.आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१४, हदगाव (नांदेड) :** हदगाव शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे सचिव सुनील सोनुले यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष शिवाजीराव तावडे, संचालक जगदीश कदम, आदर्श विद्यार्थी वसतीगृहाचे व्यवस्थापक राजेश तुपकरी, मुख्याध्यापक बंडेवार पर्यवेक्षक जाधव, दस्तूरकर, देशमुख, मुख्याध्यापक अजय काबरा, प्रा.राजेश घाटे परीक्षा प्रमुख जाधव आदींनी डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शाळेतील शिक्षिका सारिका बारसे, योगेश कदम यांनी बाबासाहेबांच्या कार्याला उजाळा दिला. प्रसिद्ध गितकार राहुल वाठोरे यांनी वामनदादा कर्डकांचे तुझीच कमाईहे सुंदर गीत गायन केले. संस्थेचे सचिव सुनीलभाऊ सोनूले यांचा वाढदिवस शाळेत उत्साहात साजरा करण्यात आला. जीवनांकुर सेवाभावी संस्थेच्या वतीने मानवाडी ते पळसा दरम्यान हायवेलगत २५ वडवृक्षांची रोपे लावून सुनीलभाऊ सोनूले यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनातून डॉ.बाबासाहेबांचे कार्य संस्कृत विभाग प्रमुख जनार्दन देशमुख यांनी सुंदर सादर केले अल्पोपहार नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या हदगाव तालुका अध्यक्षपदी चंद्रकांत भोरे यांची निवड



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, हदगाव (नांदेड) :** नांदेड येथे युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेशजी कचकलवार त्याचबरोबर नांदेड जिल्हा अध्यक्ष संभाजी सूर्यवंशी सर यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड जिल्हा कार्यकारणीची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये हदगाव तालुका अध्यक्ष पदी दैनिक अक्षराज चे तालुका प्रतिनिधी चंद्रकांत भोरे यांची निवड करण्यात आली.

यावेळी पत्रकारांच्या विविध समस्यावर सखोल अशी चर्चा करण्यात आली. गणेश कचकलवार यांनी जी चळवळ उभी केलेली आहे. ती संपूर्ण भारतभर युवा ग्रामीण पत्रकार संघ म्हणून काम करते अतिशय कमी वेळामध्ये नावरुपाला आलेली ही संघटना असून या संघटनेमध्ये बरेच पत्रकार बांधव आपली जबाबदारी या ठिकाणी पार पाडत आहेत.

उर्वरित हदगाव तालुका कार्यकारणी लवकरच जाहीर करण्यात येईल असे नवनियुक्त तालुकाध्यक्ष चंद्रकांत भोरे यांनी म्हटले आहे. यावेळी बैठकीत जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्ष व जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी उपस्थित होते.

## चिखली येथील उबाठा गटाच्या अनेक युवकांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१४, धाराशिव :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचाराने प्रेरित होऊन राज्याचे कार्यक्षम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून चिखली येथील उ.बा.ठा गटाच्या अनेक युवकांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश घेतला. प्रवेश केलेल्यामध्ये पृथ्वीराज चव्हाण, शुभम सुरवसे, सागर मते, राम चव्हाण, विकास मते, तुकाराम जाधव, सचिन पुरी स्वप्निल केंद्रे,ओमकार सुरवसे, चंदन मुळे, महादेव दाणे, प्रसाद पवार, आकाश हातागळे, अमर हातागळे, पवन हातागळे, अजय मते, जयदीप खंडाळकर, देवांश मोहिते, संदीप मते, सागर पाटील, अंकुश चव्हाण, प्रदीप चव्हाण, दीपक चव्हाण, रोहित पोंदे, ओमकार भड, सचिन राऊत, समाधान जाधव, अभिषेक मुकडे, संपत चोबे, विशाल बोंदर, विशाल चव्हाण यांचा समावेश आहे. सर्व कार्यकर्त्यांचे शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी पक्षात स्वागत करून पुढील वाटचालिस शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## उदगीर येथे स्वामी नरेंद्रचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळा

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१४, उदगीर (लातूर) :** उदगीर शहरात गुरुवार, दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्रचार्यजी महाराज यांच्या सिध्द पादुका पूजन, प्रवचन व दर्शन सोहळ्याचे आयोभजन करण्यात आले असून १७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून डॉ.रविराज विश्वनाथराव जाधव यांचे शेतात रिलायन्स पेट्रोल पंपा समोर बीदर रोड उदगीर जिल्हा लातूर, येथे आयोजित केला आहे. जिल्ह्यातील भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आव्हान स्व-स्वरूप संप्रदाय जिल्हा सेवा समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

उदगीर शहरातील शाहु चौक येथून सकाळी ८ वाजता भव्य दिव्य शोभा यात्रेने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. रथातून जगद्गुरुश्रींच्या सिद्धपादुका व प्रतिमेची भव्य मिरवणूक मार्गस्थ होईल. त्यात अनेक देखावे सादर केली जाणार आहेत. कार्यक्रमाच्या ठिकाणी शोभायात्रा पोहोचल्यानंतर गुरुपुजन होणार आहे. यास सुमारे ४ हजार भक्तगण पत्नीक गुरुपूजन करणार आहेत. त्यानंतर आरती सोहळा, श्री लीलामृत ग्रंथाचे पारायण व जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थान चे प्रवचनकार यांचे प्रवचन होणार आहे. यानंतर भक्त दीक्षा व पादुकांचे दर्शन संपन्न होणार आहे.

सोहळ्याची सांगता पादुकावर पुष्पवृष्टी करून होणार आहे. जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थान च्या सामाजिक उपक्रमा अंतर्गत मान्यवरांच्या हस्ते शिलाई मशीन चे वाटप करण्यात येणार आहे. या सोहळ्यास जिल्ह्यातून सुमारे २५ ते ३० हजार भाविक सहभागी होणार असल्याचे जिल्हा सेवा समितीच्या वतीने सांगण्यात आले.

## जिल्ह्यात साकारणार अणु उर्जेवर आधारित शेतमाल प्रक्रियेचा मेगा प्रकल्प, कांदा महा बँक 'मित्रा' चे उपाध्यक्ष आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१४, धाराशिव :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न वाढ देण्यासाठी कांद्याची महा बँक व अणुऊर्जेवर आधारित अन्न प्रक्रियेचा मेगा प्रकल्प धाराशिव जिल्ह्यात करण्याचे ठरले असून त्या अनुषंगाने श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या माध्यमातून २५० एकर जागा उपलब्ध करून देण्याचे ठरले असल्याची माहिती मित्राचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी प्रतिष्ठान भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस साहेबांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता, शेतकऱ्यांच उत्पन्न वाढाव, दुप्पट व्हाव याकरिता 'मित्रा' च्या माध्यमातून राज्यात विविध प्रकल्प राबविले जात आहेत. जिल्ह्याचा आर्थिक दृष्ट्या कायापालट करणारा हा प्रकल्प 'मित्रा' च्या माध्यमातून जिल्ह्यात आणण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्याला विकासाचा केंद्रबिंदू मानून त्यांचे उत्पन्न वाढविण्यावर जाणीवपूर्वक भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणून अणु ऊर्जेवर आधारित प्रक्रिया प्रकल्पांच्या माध्यमातून नाशवंत शेतमालाचे आयुर्मान वाढविणे तसेच प्रक्रिया केलेल्या शेतमालाच्या साठवण क्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ करण्याबाबत अनेक योजना जाहीर केल्या आहेत. या माध्यमातून शेती विषयक विशेषतः कांदा, फळे, फुल, भाज्या व इतर कृषी उत्पादनांना आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजारपेठ उपलब्ध करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे उदिष्ट आहे. धाराशिव जिल्ह्यासह सोलापूर, बीड व लातूर जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादित केला जातो. कांदा जास्त काळ टिकून रहात नाही.

बाजार भावातील चढ उतारामुळे अनेकदा शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे कांद्या वर अणु ऊर्जेच्या माध्यमातून अभारी प्रक्रिया करून त्याचे आयुर्मान वाढविण्यात येणार आहे, जेणे करून दीर्घकाळ कांदा चांगल्या स्थितीत राहील. येथे प्रक्रिया केलेला शेतमाल १०० टक्के निर्यातक्षम असणार आहे. या प्रकल्पात सुमारे २ लाख मेट्रिक टन शेतमालाची वातानुकूलित साठवणूक करता येईल, एवढा हा विशाल प्रकल्प असणार आहे. महाराष्ट्र इनस्टीट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) च्या माध्यमातून श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या माळुंब्रा गावात हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात येणार आहे.

हा प्रकल्प देश स्तरावर महत्वाचा ठरेल व यासाथी परदेशी गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न आहे. सुमारे ८०० कोटी रुपये या प्रकल्पासाठी लागणार असून पहिल्या टप्प्यात रु. १०० कोटी गुंतवणूक लागणार आहे. देशाचे महान शास्त्रज्ञ व अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर व हिंदुस्तान ॲग्रो को. ऑप. लि. चे कार्यकारी अध्यक्ष भारत ढोकणे पाटील यांच्याशी याअनुषंगाने चर्चा केली आहे. शेतकऱ्यांच्या व्यापक हिताचा विचार करून सर्वांनी सकारात्मकतेने यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी केले. पत्रकार परिषदेस भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीन काळे, सतीश दंडनाईक, दत्ताभाऊ कुलकर्णी, जिल्हा संयोजक नेताजी पाटील, विजय शिंगाडे आदी उपस्थित होते.

# थोडक्यात

## यंदाच्या उन्हाळ्यात मुंबईकरांचा रेल्वे प्रवास होणार गारेगार...




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, मुंबई :** मुंबई लोकल म्हणजे समस्त मुंबईकरांची जीवनवाहिनी, लाखो मुंबईकरांसाठी लोकल प्रवास नित्याचा आहे. लोकलमधील गर्दीत उन्हाळ्यात घामाघूम होत मुंबईकर घर ते कार्यालयात दाखल होत असतात. परंतु वाढत्या उष्णतेमुळे त्रस्त झालेल्या मुंबईकरांचा लोकल प्रवास आता अधिक गारेगार होणार आहे. मध्य रेल्वेने याबाबत महत्वाचा निर्णय घेतला आहे. वाढत्या उकाड्याच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेवर बुधवारपासून ८० वातानुकूलित लोकल फेऱ्या चालवण्यात येणार आहे. त्याचा फायदा हजारो मुंबईकरांना होणार आहे. त्यांचा प्रवास सुखद अन् गारेगार होणार आहे.

मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर वाढीव १४ वातानुकूलित लोकल सुरू करण्यात येणार आहे. यामुळे १६ एप्रिल नंतर वातानुकूलित लोकल फेऱ्यांची संख्या ६६ वरून ८० होणार आहे. वाढत्या उष्ण वातावरणात प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवासाचा अनुभव देण्यासाठी मध्य रेल्वेने ही सुविधा सुरू केली आहे. दरम्यान मध्य रेल्वेने जरी एसी लोकल फेऱ्या वाढवल्या असल्या तरी पश्चिम रेल्वेने अद्याप याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही.

सध्या मध्य रेल्वेच्या मुख्य मार्ग, हार्बर मार्ग, ट्रान्स-हार्बर मार्ग आणि बेलापूर-उरण कॉरिडॉर, नेरूळ-उरण पोर्ट मार्गिकेवरून सुमारे दररोज १ हजार ८१० लोकल फेऱ्या धावतात. त्यात कोणतीही वाढ केली नाही. परंतु १४ सामान्य लोकलच्या वेळेत वातानुकूलित लोकल चालवण्यात येणार आहे. या वातानुकूलित लोकल फेऱ्या सोमवार ते शनिवारपर्यंत धावतील. रविवार आणि सुट्टीच्या दिवशी वातानुकूलित ऐवजी सामान्य लोकल धावणार आहेत.

## टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** महामानव व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून देशाला एक चांगला मार्गदाता दिला आहे. देश प्रगतीपथावर येण्यासाठी संविधानाने महत्त्वाचा वाटा उचलला असून, या महामानवाचा आदर्श सर्वांनी घ्यायला हवा, अशा भावना सरपंच अरुणा खिलारी यांनी व्यक्त केल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सरपंच अरुणा खिलारी यांनी टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत कार्यालयात राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तद्नंतर दिपप्रज्वलन करून शिवाजी गायकवाड यांनी बुद्धवंदना घेतली. याप्रसंगी सरपंच खिलारी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिले. सर्व जाती-धर्माचा विचार करून त्यांनी संविधानाची निर्मिती केली. अफाट व्यक्तिमत्व असणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर व इतर युगपुरुषांची आपण नेहमीच आठवण ठेवली पाहिजे. सर्वांनी जयंती सोहळा आनंदाने साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी, सरपंच अरुणा खिलारी, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब दावभट, माजी सरपंच शिवाजी खिलारी, ग्राम.पं.सदस्या सुग्राबी हवलदार, ग्राम पंचायत सदस्य किशोर गायकवाड, शिवाजी गायकवाड, मंथन गायकवाड, भगवान गायकवाड, दर्शन गायकवाड, लखण आल्हाट, बाळासाहेब जेजूरकर, पंकज गायकवाड, योहन गायकवाड, सागर गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते कुंडलीत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

## हिवरे बाजार देशाला नव्हे तर जगाला दिशादर्शक - ब्रिगेडीअर डिसोझा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** एम.आय.सी. ॲन्ड एस.चे ब्रिगेडीअर रुसेल डिसोझा यांनी सोमवार, दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी नगर तालुक्यातील आदर्श गाव हिवरे बाजारला भेट दिली. त्यांच्यासमवेत कर्नल अमन दत्ता, कर्नल सकेत रावत, कर्नल अभिषेक पटवर्धन, कर्नल बिजॉय, लेफ्टनंट कर्नल सिंह, लेफ्टनंट कर्नल प्रोहित, लेफ्टनंट कर्नल अनुराग, लेफ्टनंट कर्नल संदेश भवानी, मेजर अहुलीवालीया, मेजर मोहमद रफी, आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांनी विविध विकास कामांची माहिती दिली. भेटीप्रसंगी गावातील विकासकामे व स्वच्छता पाहून डिसोझा हे भारावून गेले. जगात अशा प्रकारचे गाव असू शकते याची प्रचीती प्रत्यक्ष हिवरे बाजार पाहिल्यानंतर आली. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले, हिवरे बाजार भारत देशालाच नव्हे संपूर्ण जगाला दिशादर्शक असे गाव आहे.

पद्मश्री डॉ.पोपटराव पवारांच्या नेतृत्वाखाली गावातील विविध विकास कामे झालेली पाहिल्यानंतर आदर्श नेतृत्व असल्यास गाव कसे बदलते यांचे उत्तम उदाहरण हिवरे बाजार आहे. ब्रिरिगेडिय डिसोझा म्हणाले, सध्या जागतिक तापमानवाढीमुळे जगाच्या समोर ज्या समस्या आहेत त्याचे उत्तर हिवरे बाजारमध्ये आहे. म्हणून देशातील परदेशातील लाखो पर्यटक हिवरे बाजारला भेटी देतात. लोकांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला तर जगातील प्रत्येक गाव हे हिवरे बाजारसारखे स्वयंपूर्ण होऊ शकते. यशवंत माध्यमिक विद्यालयातील एन.सी.सी.विद्यार्थ्यांनी त्यांना संचलन करत मानवंदना दिली.पद्मश्री पोपटराव पवार यांनी फेटा बांधून श्रीफळ देऊन सन्मान केला. याप्रसंगी सरपंच विमल ठाणगे, सोसायटीचे चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा चेअरमन रामभाऊ चत्तर, एस.टी. पादिर, रो.ना.पादिर, राजू सहादू ठाणगे, संदीप गुंजाळ तसेच ग्रामस्थ, पदाधिकारी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.